# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

'सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ'

## महाविद्यालय विकास विभाग

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी
टी–पॉईंट मार्ग, नागपुर–४४० ०३३, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२,२५२२३९०

**Email ID : infoarcollege@ymail.com**

क्र.रातुमनावि/म.वि.वि./पदव्युत्तर प्रवेश/४९२९ दिनांक:–१८/०७ /२०२३.

प्रती,

प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

विषय : सत्र २०२३–२४ करीता अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदव्युत्तर पदवी स्तरावरील प्रथम वर्षातील प्रवेशाबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील ज्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासन स्तरावरुन केंद्रीकृत पध्दतीने करण्यांत येत नाही अशा सर्व अव्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्षाचे सत्र २०२३–२४ करिता महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन करावयाचे आहे. सदर संपूर्ण प्रवेशाची प्रक्रिया उदा. मेरिट सूची जाहीर करणे, प्रवेश देणे, प्रतिक्षा यादीतून प्रवेश देणे इत्यादी संपूर्ण प्रवेशाबाबतची प्रक्रिया ही निकाल जाहीर झाल्यानंतर २५ दिवसाचे आंत पूर्ण करणे क्रमप्राप्त राहील. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी महाविद्यालयांना/विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या संकेतस्थळावर करणे अनिवार्य राहील याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याची प्रक्रिया दिनांक २१–७–२०२३ पासून सुरु करता येईल याची देखिल नोंद घ्यावी.

कळावे.

आपला,

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (म.वि.वि.)

JN:ONLI CARCULAR./doc.